**नियमित फौजदारी खटला क्रं.१९२/२०२६**
**नि.क्रं.०६**
कल्याण लोहमार्ग पोलिस ठाणे गु.रं.नं.४०/२६

MHTH110029802026

: **न्या य नि र्ण य** :
( दिनांक ०१ एप्रिल २०२६ रोजी घोषित )

१. प्रस्तुत प्रकरण आरोपी **तोफिक नसीम खान** विरुद्ध प्रस्तुतचे दोषारोपपत्र कल्याण लोहमार्ग पोलिस यांनी भारतीय न्याय संहिता कलम ३०३(२) अन्वये दाखल केले आहे. आज रोजी दि.०१/०४/२०२६ रोजी आरोपीला आधारवाडी कारागृहातुन व्हिडीओ कॅन्फरन्सव्दारे हजर केले असता त्याने स्वत:हून गुन्हा कबूल केलेला आहे. त्याप्रमाणे आरोपीविरुध्द नि.०४ कडे दोषारोप ठेवला. आरोपीने स्वत: हून गुन्हा कबूल केला तसे निवेदन नि.०५ कडे दिले. आरोपीने स्वखुशीने गुन्हा कबूल केल्याबाबत मी खात्री केली. तसेच आरोपीचे शिक्षेबाबत म्हणणे ऐकले.

२. प्रस्तुत प्रकरणात दिनांक १६/०१/२०२६ रोजी २०.४५ वा. चे सुमारास फिर्यादी दर्शन सुनिल नाईक हे कल्याण रेल्वे स्टेशन फलाट क्र. ०५ वर आलेल्या गाडी नं. १२५३३ पुष्पक एक्सप्रेस गाडीचे गार्ड बाजुकडील पहिले क्रमांकाचे जनरल डब्यातून प्रवाशांचे गर्दीतून उतरत असताना आरोपीने फिर्यादी यांचे नेसते पॅन्टचे उजवे खिशातील मोबाईल फोन लबाडीने चोरी केला. त्यामुळे आरोपीला अपराधी परिविक्षा अधिनियमातील तरतूदींचा लाभ देणे योग्य होणार नाही. आरोपीने आज रोजी सदरचा गुन्हा कबूल करून त्याचे कुटुंबीय त्याचेवर अवलंबून असल्याचे कथन करून कमीत कमी शिक्षा देण्याची विनंती केलेली आहे. तसेच आरोपी विरूध्द प्रस्तुत खटल्याशिवाय चोरी केल्याचा या न्यायालयात नियमित फौजदारी प्रकरण क्र. १७८/२०२६, प्रलंबित असून आरोपीने आज रोजी तो गुन्हा देखील कबूल केलेला आहे. आरोपी हयाचे वय १९ वर्षे असल्याचे दिसून येत आहे. आरोपी दिनांक १७/०१/२०२६ पासुन आजपर्यंत म्हणजेच ०२ महिने १५ दिवस कारागृहात आहे.

सबब, हया सर्व बाबींचा विचार करता खालील प्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे.

## आदेश

| | |
|---|---|
| १) | **आरोपी तोफिक नसीम खान** हयास प्रस्तुत खटल्यात भारतीय न्याय संहिता कलम ३०३(२) च्या गुन्हयासाठी भारतीय नागरिक सुरक्षा संहिता कलम २६४ अन्वये दोषी ठरविण्यात येते. |
| २) | आरोपी भारतीय न्याय संहिता कलम ३०३(२) च्या गुन्हयासाठी **तीन महिने १५ दिवस** साध्या कारावासाची शिक्षा ठोठावण्यात येते. |
| ३) | आरोपीने हया प्रकरणातील शिक्षा **नियमित फौजदारी प्रकरण क्र. १७८/२०२६** मधील शिक्षेसोबत भोगायची आहे. |
| ४) | भारतीय नागरिक सुरक्षा संहिता कलम ४६८ अन्वये आरोपीने न्यायालयीन बंदी असतांना भोगलेल्या शिक्षेची सदर शिक्षेतुन सुट देण्यात येते. |
| ५) | आरोपीला निकालपत्राची छायाप्रत विनामुल्य व त्वरीत देण्यात यावी. |
| ६) | प्रस्तुत प्रकरणात जप्त करण्यात आलेला विवो कंपनीचा काळया रंगाचा मोबाईल फोन हा फिर्यादी हयांना दिलेला आहे. अपील कालावधनंतर सदर मोबाईल फोनचा ताबा कायमस्वरुपी करण्यात यावा. |
| ७) | प्रस्तुत प्रकरण निकाली काढण्यात आले. |

VISHWAS PANDURANG SHINDE

Digitally signed by VISHWAS PANDURANG SHINDE
Date: 2026.03.31 19:31:53 +0530

(व्ही.पी.शिंदे)
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग लोहमार्ग
लोहमार्ग न्यायालय, कल्याण

कल्याण
दिनांक : ०१/०४/२०२६